दैनिक
# अतुल्य महाराष्ट्र
बीड महाराष्ट्र | गुरुवार, 20 ऑगस्ट 2026 | अंक क्र. 103 | वर्षे 4 थे | मुल्य 3 रुपये | पृष्ठे 4

WEBSITE : ATULYMAHARASHTRA.COM RNI RGN No. MAH/MAR 2023/52446 EMAIL : DAILYATULYAMAHARASHTRA@GMAIL.COM

# अन्न भेसळीसाठी वापरल्या जाणाऱ्या 'व्हे पावडर'चा अवैध साठा जप्त; आष्टी पोलिसांची मोठी कारवाई

■ आष्टी प्रतिनिधी :

दुधात भेसळ करण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या 'व्हे पावडर'च्या अवैध वाहतूक आणि पुरवठ्याप्रकरणी आष्टी पोलिसांनी मोठी कारवाई केली असून, या कारवाईत एकूण ७२ गोण्या (१ हजार ८०० किलो) व्हे पावडर जप्त करण्यात आली आहे. या प्रकरणी सुशांत उर्फ बाबू लक्ष्मण गोपाळघरे, हरिदास एकनाथ गोपाळघरे (दोघे रा. नागोबाची वाडी, ता. जामखेड, जि. अहिल्यानगर) आणि कैलास हंबर्डे (रा. आष्टी, जि. बीड) या तिघांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, १८ ऑगस्ट २०२६ रोजी आष्टी-जामगाव रोडवरील नक्षत्र लॉन्ससमोर दुधात भेसळ करण्यासाठी व्हे पावडरची अवैध वाहतूक होत असल्याची गोपनीय माहिती पोलीस निरीक्षक आष्टी यांना मिळाली होती. या माहितीच्या आधारे सहायक पोलीस निरीक्षक एस. एस. वाघमोडे यांच्या पथकाने सापळा रचून संशयित पिकअप वाहनाची (क्र. MH-13-CU-4141) तपासणी केली असता, वाहनात २५ किलो वजनाच्या ४७ गोण्या आढळून आल्या. वाहनचालकाकडे अधिक चौकशी केली असता त्याने आष्टीतील एका ठिकाणी यापूर्वीच २५ गोण्यांचा पुरवठा केल्याचे कबूल केले. पोलिसांनी तत्काळ त्या ठिकाणाहूनही २५ गोण्या जप्त केल्या. अशा प्रकारे एकूण २ लाख ६९ हजार ७०० रुपये किमतीची ७२ गोण्या व्हे पावडर जप्त करण्यात आली. अन्न सुरक्षा अधिकाऱ्यांनी दिलेल्या फिर्यादीवरून आष्टी पोलीस ठाण्यात अन्न सुरक्षा व मानके अधिनियम आणि भारतीय न्याय संहितेअंतर्गत वरील तिन्ही आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही कारवाई पोलीस अधीक्षक बीड, अपर पोलीस अधीक्षक बीड आणि उपविभागीय पोलीस अधिकारी आष्टी यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक शरद भुतेकर, सहायक पोलीस निरीक्षक नाना सूर्यवंशी, एस. एस. वाघमोडे, पोलीस हवालदार तागड, जगताप, पोलीस कॉन्स्टेबल वाणी, सजगणे व गुजर यांनी केली असून, प्रकरणाचा पुढील तपास पोलीस करत आहेत.


प्रतिकात्मक फोटो



## वाघीरा येथे जंगी कुस्त्यांचे सामने संपन्न गुणवंत विद्यार्थी व खेळाडू यांचा तुकाराम मुंढे यांचे आत्मचरित्र देऊन सन्मान

■ वाघीरा ता. पाटोदा

सालाबदाप्रमाणे वै.ह.भ.प. संत श्री सीतारामबाबा यांच्या अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन गावकऱ्यांच्या वतीने करण्यात येते. यानिमित्त बजरंग क्रीडा मंडळ व व्यायाम शाळा यांच्यावतीने जंगी कुस्त्यांचे सामने आयोजित करण्यात आले. मागील 30 वर्षापासून ही परंपरा क्रीडा मंडळाच्या वतीने अखंडित सुरू आहे. यामध्ये 101 रुपयापासून 7001 रुपये पर्यंत बक्षीस ठेवण्यात आले होते. या कुस्ती आखाड्याचे उद्घाटन गावातील वयोवृद्ध पैलवान महादेव बांगर, रामराव बावणे आणि आळंदी येथील ह.भ.प.श्रीनिवास शास्त्री महाराजांच्या हस्ते करण्यात आले. वाघीरा व पंचक्रोशीतील अनेक उदयन्मुख मल्लांनी चटकदार कुस्त्या करून प्रेक्षकांची मने जिंकली. गावातील गुणवंत विद्यार्थी व राज्यस्तरावर उत्कृष्ट कामगिरी करणारे खेळाडू यांचा सन्मान, यावेळी क्रीडा मंडळाच्या वतीने आयएएस अधिकारी श्री तुकाराम मुंढे यांची आत्मचरित्र पुस्तक, शाल व श्रीफळ भेट देऊन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. या कुस्ती स्पर्धेसाठी पुरुषांसह महिला प्रेक्षक ही मोठ्या प्रमाणात उपस्थित राहिले ही विशेष बाब राहिली. पुरुषांबरोबर महिलांच्या ही कुस्त्या आखाड्यामध्ये लावण्यात आल्या, अतिशय चटकदार कुस्त्या महिला पैलवान यांनी केल्या. कुस्ती मैदान साठी प्रमुख पाहुणे म्हणून बीड जिल्ह्याचे क्रीडा अधिकारी अरविंद विद्यागर, तालुका क्रीडा अधिकारी श्री ढाकणे सर, नेकनूर पोलीस स्टेशनचे एपीआय साळवे सर, सरपंच श्रीकृष्ण बांगर, जिल्हा तालीम संघाचे उपाध्यक्ष पैलवान संभाजी मिसाळ, इसाक शेख, यांच्यासह मान्यवरांनी उपस्थिती लावून खेळाडूंचे कौतुक केले व त्यांना रोख स्वरूपात बक्षीस ही दिले. लहान मोठ्या शंभर पर्यंत कुस्त्या या मैदानात झाल्या, अंतिम कुस्ती बाळू बहिरवाळ विरुद्ध सुशील करे यांच्यात झाली. यामध्ये बाळू बहिरवाळ जखमी झाल्यामुळे करे यांना विजयी घोषित करण्यात आले. याशिवाय आकीब शेख, उमेर शेख, नवनाथ सानप, अक्षय बहिरवाळ, दत्ता मेटे या मल्लांच्याही चटकदार कुस्त्यांनी प्रेक्षकांच्या डोळ्याचे पारणे फेडले. कुस्ती आखाड्यातील कुस्तीचे धावते समालोचन करण्यासाठी पै.महादेव मुजमुले व मोहसीन आतार यांनी मैदानात वेगळी रंगत आणली. अंतिम कुस्तीनंतर भक्ती - शक्तीची देवता बजरंग बली आणि संत सिताराम बाबा यांचा जय घोष करून कुस्त्यांची सांगता झाली. या कुस्त्या यशस्वी करण्यासाठी बजरंग क्रीडा मंडळ व व्यायाम शाळेचे संस्थापक अध्यक्ष पैलवान हरिभाऊ बांगर यांच्या मार्गदर्शनाखाली पै. वैजनाथ बांगर, महेश घुले, बिबीशन नागरे, विलास वाघमारे, सुंदर बांगर, भाऊसाहेब बांगर, बिबीशन बांगर, गणेश बावणे, जयराम गर्जे, डॉ पवन बांगर, अजिंक्य बांगर, जयराम बांगर, अजिनाथ बांगर यांनी पंच म्हणून कामगिरी पार पाडली.



## खरोळा येथील शिवमहापुराण कथा ज्ञानयज्ञात भाजपाचे युवा नेते ऋषिकेश कराड सहभागी

■ लातूर प्रतिनिधी

रेणापूर तालुक्यातील मौजे खरोळा येथील चनबस स्वामी मठ येथे असलेल्या सदगुरु संगनबसव स्वामी यांच्या शिव महापुराण कथा ज्ञान यज्ञात भाजयुमोचे जिल्हाध्यक्ष युवा नेते श्री. ऋषिकेशदादा रमेशआप्पा कराड यांनी मंगळवारी सायंकाळी आवर्जुन सोहळ्यात सहभाग नोंदवला.

राष्ट्रसंत परमपूज्य डॉ. शिवलिंग शिवाचार्य महाराज अहमदपूरकर यांच्या कृपा आशीर्वादाने गेल्या १३ ते २० ऑगस्ट दरम्यान खरोळा येथील चनबस स्वामी मठ परिसरात सद्गुरु संगणबसव स्वामी यांची शिव महापुराण कथा आहे. या कथा ज्ञानयज्ञ सोहळ्यात भाजपाचे युवा नेते मा. ऋषिकेशदादा रमेशआप्पा कराड यांनी मंगळवार १८ ऑगस्ट रोजी आवर्जून उपस्थिती लावली आणि कार्यक्रमात सहभाग नोंदवला. यावेळी श्री. ऋषिकेशदादा कराड यांनी सद्गुरु संगनबसव स्वामींचा यथोचित सत्कार केला. तर शिव महापुराण कथा नियोजन समितीच्या वतीने स्वामीजींच्या हस्ते ऋषिकेशदादा कराड यांचा सत्कार करून स्वागत केले.

यावेळी जिल्हा परिषदेच्या महिला व बालकल्याण सभापती सौ. शिवकन्याताई गोडभरले, भाजपा मंडल अध्यक्ष महेंद्र गोडभरले, युवा मोर्चा मंडल अध्यक्ष अमर चव्हाण, रमाकांत फुलारी, बाळूआप्पा हेणे, हनुमंत राऊतराव, सुभाष हेने, संजय पिंपळे, बालाजी बावचकर, मच्छिंद्र कपाळे, संजय मलिषे, प्रताप राऊतराव, वैजनाथ पत्रावळे, गुरुनाथ बरगिले, राजाभाऊ उकरडे, कल्याण मदने, विजयकुमार कपाळे, शिवप्रसाद मेगले, सचिन राऊतराव, अमोल कपाळे, मंगेश पिंपळे, सोमनाथ मलीशे, उमाकांत पिंपळे, अशोक पांचाळ यांच्यासह भाविक भक्त महिला पुरुष मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# पिंपरी बु.च्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचा आधार ‘देशपातळीवर नावलौकिक मिळवा’ : उत्तम माने

■ परळी वैजनाथ (प्रतिनिधी)

ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी प्रोत्साहन देत त्यांच्या सर्वांगीण विकासाला बळ देण्याच्या उद्देशाने भाग्याई सामाजिक व शैक्षणिक संस्था, कल्याण पूर्व यांच्या वतीने पिंपरी बु. येथील जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांना मोफत शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले.

यावेळी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना ज्येष्ठ नेते उत्तम माने म्हणाले, “विद्यार्थ्यांनी शिक्षणासोबत संस्कार, शिस्त, क्रीडा आणि सर्वांगीण विकासावर भर देत देशपातळीवर आपला नावलौकिक मिळवावा. कठोर परिश्रम हेच यशाचे गमक असून, सातत्यपूर्ण अभ्यासातून आई-वडिलांच्या कष्टाचे चीज करावे.

विद्यार्थी हा शिक्षण व्यवस्थेचा केंद्रबिंदू असून, शिक्षणाचा उद्देश केवळ नोकरी मिळवणे नसून संस्कारक्षम, जबाबदार आणि सक्षम नागरिक घडवणे हा आहे, असे उत्तम माने यांनी सांगितले. विद्यार्थ्यांमध्ये भावनिक, आध्यात्मिक व सामाजिक बुद्धिमत्ता विकसित होण्याबरोबरच कठीण प्रसंगी योग्य निर्णय घेण्याची क्षमता निर्माण होणे आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले.

ग्रामीण विद्यार्थ्यांनी शहरी विद्यार्थ्यांपेक्षा कोणत्याही क्षेत्रात मागे राहू नये, असे आवाहन करत माने म्हणाले की, आजचे युग स्पर्धेचे असून कृत्रिम बुद्धिमत्ता आणि आधुनिक तंत्रज्ञानाचा प्रभाव सर्वच क्षेत्रांत वाढला आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांनी तंत्रज्ञानाचा योग्य वापर करून ज्ञानाची कास धरावी. मोबाईलचा अनावश्यक वापर टाळून अभ्यासाला प्राधान्य द्यावे आणि स्पर्धा परीक्षांच्या तयारीकडेही गांभीर्याने पाहावे, असा सल्ला त्यांनी दिला.

शिक्षणाबरोबरच खेळ, शिस्त आणि आत्मसंरक्षण यांनाही विद्यार्थ्यांच्या जीवनात महत्त्वाचे स्थान आहे. मोबाईल आणि तंत्रज्ञानाच्या वाढत्या वापरामुळे मैदानी खेळ कमी होत असताना विद्यार्थ्यांनी शारीरिक तंदुरुस्ती आणि मानसिक सक्षमतेसाठी खेळांकडे वळणे गरजेचे आहे, असेही यावेळी सांगण्यात आले.





### ‘शैक्षणिक साहित्याअभावी कोणाचेही शिक्षण थांबू नये’

■ भाग्याई सामाजिक व शैक्षणिक संस्थेचे अध्यक्ष भाऊसाहेब राठोड यांनी या उपक्रमामागील भूमिका स्पष्ट करताना सांगितले की, “शालेय साहित्याच्या खर्चामुळे कोणत्याही विद्यार्थ्याचे शिक्षण थांबू नये, ही आमची भूमिका आहे. गुणवंत आणि गरजू विद्यार्थ्यांपर्यंत आवश्यक साहित्य पोहोचवून त्यांच्या शैक्षणिक वाटचालीला बळ देण्याचा हा प्रामाणिक प्रयत्न आहे. ‘सेवा हीच आमची ओळख’ या भावनेतून हा उपक्रम राबविण्यात आला.” या उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांना वह्या, लेखन साहित्य व इतर आवश्यक शैक्षणिक साहित्याचे मोफत वाटप करण्यात आले. आर्थिकदृष्ट्या दुर्बल कुटुंबातील विद्यार्थ्यांसाठी हा उपक्रम निश्चितच आधार देणारा ठरला. वेळेवर मिळणारी छोटीशी मदतही विद्यार्थ्यांच्या शिक्षणाला आणि भविष्यातील वाटचालीला नवी दिशा देऊ शकते, अशी भावना संस्थेच्या वतीने व्यक्त करण्यात आली. विशेष म्हणजे, संस्थेचे अध्यक्ष भाऊसाहेब राठोड आणि ज्येष्ठ नेते उत्तम माने हे बालपणीचे वर्गमित्र असून, या उपक्रमाच्या निमित्ताने त्यांचे जुने ऋणानुबंधही अधोरेखित झाले. यावेळी ज्येष्ठ नेते उत्तम माने, युवा नेते सुरेश माने, संस्थेच्या वतीने श्री. राठोड, शालेय समिती अध्यक्ष हनुमंत पोळ, राम आडे, संजय राठोड, दत्ता दिपू राठोड, विष्णू दत्ता राठोड यांच्यासह जिल्हा परिषद शाळेतील शिक्षक, शिक्षिका, शिक्षकेत्तर कर्मचारी आणि पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. शैक्षणिक साहित्य मिळाल्यानंतर विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर उमटलेला आनंद आणि शिक्षणाची दिसून आलेली जिद्द हेच या उपक्रमाचे खरे यश ठरले. शाळेच्या वतीने भाग्याई सामाजिक व शैक्षणिक संस्था, उपस्थित मान्यवर आणि सहकार्य करणाऱ्या सर्वांचे आभार मानण्यात आले.

# वडवणीत संत नामदेव महाराजांचा संजीवन समाधी सोहळा उत्साहात साजरा

## गाथा पारायण, कीर्तन, पालखी मिरवणूक व महाप्रसादाने भक्तीमय सोहळा रंगला

वडवणी (प्रतिनिधी)

विठ्ठल नामाचा गजर, संत नामदेव महाराजांचा जयजयकार आणि टाळ-मृदंगाच्या निनादाने वडवणी शहर भक्तीरसात न्हाऊन निघाले. सर्व शिंपी समाज बांधवांच्या वतीने आयोजित करण्यात आलेला संत शिरोमणी नामदेव महाराज यांचा संजीवन समाधी सोहळा विविध धार्मिक व आध्यात्मिक कार्यक्रमांनी अत्यंत भक्तिमय वातावरणात उत्साहात संपन्न झाला.

दि.३ ऑगस्ट ते १० ऑगस्ट या कालावधीत आयोजित करण्यात आलेल्या या सोहळ्यात ह.भ.प. दामू अण्णा गोंडे महाराज यांच्या प्रवचन व मार्गदर्शनाखाली सकाळी ७ ते दुपारी १२ या वेळेत गाथा पारायण संपन्न झाले. संतवाङ्मयाचे श्रवण, नामस्मरण आणि भक्तीमय वातावरणामुळे परिसरात आध्यात्मिक वातावरण निर्माण झाले होते. सोमवार, दि.१० ऑगस्ट रोजी संजीवन समाधी सोहळ्याच्या मुख्य कार्यक्रमानिमित्त ह.भ.प.सुधाकर महाराज चिनके यांचे सकाळी १० ते दुपारी १२ या वेळेत रसाळ व प्रबोधनपर कीर्तन झाले. आपल्या कीर्तनातून त्यांनी संत नामदेव महाराजांचे जीवनकार्य, विठ्ठल भक्ती आणि नाममहिमेचे महत्त्व भाविकांसमोर मांडले. कीर्तनानंतर आरती संपन्न झाली. यावेळी पांडुरंगाच्या आरती व महापूजेचे मानकरी म्हणून दिगंबरराव माळवदे, तर संत नामदेव महाराजांच्या आरती व महापूजेचे मानकरी म्हणून संजय ऊरुनकर यांच्या हस्ते धार्मिक विधी पार पडले. तसेच कीर्तनकारांचा शाल व श्रीफळ देवून सन्मान करण्यात आला. यानंतर संत नामदेव महाराजांच्या पालखीची भव्य मिरवणूक काढण्यात आली. यावेळी टाळ-मृदंगाचा गजर, विठ्ठल नामाचा जयघोष आणि हरिनामाच्या निनादाने संपूर्ण परिसर दुमदुमून गेला. पालखी मिरवणुकीत भाविकांनी मोठ्या उत्साहाने सहभाग घेत संत नामदेव महाराजांचे दर्शन घेतले.

सोहळ्याच्या समारोपानंतर आयोजित महाप्रसादाचा लाभ वडवणीसह पंचक्रोशीतील हजारो भाविकांनी घेतला. दुपारपासून सुरु असलेल्या महाप्रसादाचा भाविकांनी मोठ्या भक्तीभावाने आस्वाद घेतला. त्यामुळे संपूर्ण परिसरात भक्ती, श्रध्दा आणि सामाजिक एकोप्याचे सुंदर दर्शन घडले. संत नामदेव महाराजांच्या भक्तीपरंपरेचा जागर करणारा, नामस्मरणातून अंतःकरण पवित्र करणारा आणि संतविचारांतून जीवनाला नवी दिशा देणारा हा सोहळा भाविकांसाठी अविस्मरणीय ठरला. आयोजकांच्या नियोजनातून धार्मिक परंपरेसोबतच सामाजिक एकात्मता आणि बंधुभावाची भावना अधिक दृढ झाल्याचे यावेळी दिसून आले.





# वडवणीत प्रथमच जिल्हा परिषदेच्या शाळांतील लेकरांच्या यशाला मानाचा मुजरा

## गटसाधन केंद्राचा प्रेरणादायी गुणगौरव सोहळा संपन्न

वडवणी,प्रतिनिधी



वडवणी पंचायत समिती अंतर्गत तालुका गटसाधन केंद्राच्या वतीने व तालुक्याचे कार्यतत्पर गटशिक्षणाधिकारी राहुल भट्टी यांच्या संकल्पनेतून आयोजित जिल्हा परिषद शाळांतील वडवणी तालुका गुणवंत गुणगौरव सोहळा-२०२६ हा प्रेरणादायी कार्यक्रम बुधवार, दि.५ ऑगस्ट २०२६ रोजी गटसाधन केंद्र, वडवणी येथे अत्यंत उत्साहपूर्ण वातावरणात व मान्यवरांच्या उपस्थितीत संपन्न झाला. वडवणी तालुक्यात प्रथमच जिल्हा परिषदेच्या शाळांतील लेकरांच्या कौतुकाचा अशा मोठ्या स्वरुपाचा गुणवंत विद्यार्थी गौरव सोहळा आयोजित करण्यात आल्याने विद्यार्थी, पालक व शिक्षकांमध्ये विशेष उत्साहाचे वातावरण निर्माण झाले.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी पंचायत समिती वडवणीचे गटविकास अधिकारी अशोक बाराखोते हे होते. त्यांच्या हस्ते तालुक्यातील विविध स्पर्धा परीक्षा व शिष्यवृत्ती परीक्षांमध्ये उल्लेखनीय यश मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांचा सन्मानपत्र, शाल व पुष्पगुच्छ देवून गौरव करण्यात आला. यामध्ये शासकीय सैनिकी विद्यालयासाठी प्रवेश मिळविलेले अथर्व बंडू नागरगोजे व राजवीर मुकुंदराज घुगे, तसेच जवाहर नवोदय विद्यालयासाठी प्रवेश मिळविलेले तनिष्का उध्दव बडे, पियुष कल्याण तांदळे व यश भानुदास गाडे यांचा विशेष गौरव करण्यात आला. तसेच शिष्यवृत्तीधारक विद्यार्थी शिवम गंगाराम यादव, प्रांजल मल्हारी चोले, अर्पिता राजेभाऊ राठोड व आर्यन आसाराम मुंडे यांचाही सत्कार करण्यात आला. याशिवाय क्रीडा प्रबोधिनी, बालेवाडी (पुणे) येथे पुढील शिक्षणासाठी पात्र ठरलेली गुणवंत विद्यार्थिनी समृध्दी सुधाकर मुंडे हिचाही विशेष सन्मान करण्यात आला. या सर्व गुणवंत विद्यार्थ्यांसोबत त्यांच्या आई-वडील पालकांचाही सन्मान करुन त्यांच्या प्रोत्साहन व योगदानाबध्दल कृतज्ञता व्यक्त करण्यात आली. या सर्व विद्यार्थ्यांच्या यशामागे मोलाचे योगदान देणारे त्यांचे मार्गदर्शक शिक्षक ए.आर.मुंडे सर, जी.एस.मुंडे सर, एस.एस.चिकाळकर सर, व्ही.ए.काकडे सर, डी.जी.टिपरे सर, आर.आर.धाईतिडक सर, एन.आर.बर्गे मॅडम व जे.एस.भस्करे सर यांचाही अभिनंदनपत्र व पुष्पगुच्छ देवून मान्यवरांच्या हस्ते गौरव करण्यात आला. या कार्यक्रमास देवळा केंद्राचे केंद्रप्रमुख ज्ञानेश्वर आळणे, चिंचवण केंद्राचे केंद्रप्रमुख रणजीत शिंदे, पिंपरखेड केंद्राचे केंद्रप्रमुख प्रफुल्ल टकले, वडवणी केंद्राचे केंद्रप्रमुख नितीन डोंगरदिवे, चिंचाळा केंद्राचे केंद्रप्रमुख अरुण शिंदे, काडीवडगांव केंद्राचे केंद्रप्रमुख रामकिसन सांगळे तसेच कन्या वडवणी केंद्राचे केंद्रप्रमुख कृष्णा शिंदे यांची प्रमुख उपस्थिती लाभली. यावेळी गटशिक्षणाधिकारी राहुल भट्टी यांनी आपल्या मनोगतात सांगितले की, ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांमध्ये अपार क्षमता आहे. योग्य मार्गदर्शन, सातत्यपूर्ण सराव आणि शिक्षक-पालकांचे सहकार्य मिळाल्यास विद्यार्थी मोठ्या स्पर्धांमध्ये निश्चित यश मिळवू शकतात. या गुणवंतांचा सन्मान म्हणजे त्यांच्या कर्तृत्वाचा गौरव असून इतर विद्यार्थ्यांसाठीही ही मोठी प्रेरणा आहे. तालुक्यातील प्रत्येक शाळा गुणवत्तेच्या दिशेने वाटचाल करेल, हा आमचा संकल्प आहे असेही यावेळी गटशिक्षणाधिकारी भट्टी म्हणाले. अध्यक्षीय समारोपाप्रसंगी गटविकास अधिकारी अशोक बाराखोते यांनी आपल्या मार्गदर्शनात सांगितले की, शिक्षण ही समाजाच्या प्रगतीची खरी गुरुकिल्ली आहे. विद्यार्थ्यांचा गौरव म्हणजे उज्ज्वल भविष्यातील गुंतवणूक आहे. पंचायत समिती शिक्षण क्षेत्राच्या उन्नतीसाठी कटिबध्द असून गुणवंत विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देण्यासाठी अशा उपक्रमांचे सातत्याने आयोजन केले जाईल. ते पुढे म्हणाले की, गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मान हा केवळ त्यांच्या यशाचा गौरव नसून इतर विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी ठरतो. कठोर परिश्रम, चिकाटी आणि सातत्य यांच्या बळावर कोणतेही ध्येय गाठता येते, याचे उत्तम उदाहरण हे विद्यार्थी आहेत. प्रत्येक विद्यार्थ्यामध्ये अमर्याद क्षमता दडलेली असून योग्य मार्गदर्शन, पालकांचे सहकार्य आणि शिक्षकांचे समर्पित प्रयत्न यांच्या माध्यमातून ती क्षमता अधिक प्रभावीपणे विकसित होवू शकते. आजच्या स्पर्धात्मक युगात केवळ शैक्षणिक गुणवत्ताच नव्हे, तर नैतिक मूल्ये, सामाजिक जबाबदारी, वैज्ञानिक दृष्टिकोन आणि नाविन्यपूर्ण विचारसरणी यांचाही विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासात महत्त्वाचा वाटा आहे. विद्यार्थ्यांनी आत्मविश्वास, शिस्त, जिज्ञासा आणि सकारात्मक दृष्टिकोन जोपासत समाजहिताची जाणीव ठेवून पुढे वाटचाल करावी, असे आवाहनही त्यांनी केले. पालक आणि शिक्षक हे विद्यार्थ्यांच्या यशामागील खरे शिल्पकार आहेत. त्यांच्या अथक परिश्रमामुळेच विद्यार्थी यशाची नवी शिखरे गाठतात. त्यामुळे या यशामध्ये विद्यार्थ्यांसोबतच पालक आणि शिक्षकांचाही तितकाच मोठा वाटा आहे, असे त्यांनी नमूद केले. शेवटी त्यांनी सर्व गुणवंत विद्यार्थ्यांचे, त्यांच्या पालकांचे व शिक्षकांचे अभिनंदन करत भविष्यातही अशाच जिद्दीने आणि प्रामाणिक प्रयत्नांनी यश संपादन करुन आपल्या कुटुंबाचे, गावाचे, तालुक्याचे आणि देशाचे नाव उज्ज्वल करावे, अशा शुभेच्छा व्यक्त केल्या.

# शालेय शिक्षण समितीच्या अध्यक्षपदी शेख एजाज, तर उपाध्यक्षपदी अलीम शेख यांची निवड

वडवणी, प्रतिनिधी :

वडवणी तालुक्यातील उपळी येथील जिल्हा परिषद उर्दू शाळेतील शालेय शिक्षण समितीची निवड प्रक्रिया उत्साहात पार पडली. यावेळी समितीच्या अध्यक्षपदी शेख एजाज यांची बिनविरोध निवड करण्यात आली, तर उपाध्यक्षपदी शेख अलीम यांची निवड झाली.

नवनिर्वाचित अध्यक्ष शेख एजाज यांनी सर्व पालकांचे आभार मानत शाळेच्या शैक्षणिक व भौतिक विकासासाठी सदैव प्रयत्नशील राहण्याचे आश्वासन दिले. विद्यार्थ्यांच्या विविध समस्या सोडविण्यासोबतच शाळेच्या सर्वांगीण प्रगतीसाठी शालेय शिक्षण समितीच्या माध्यमातून प्रभावीपणे काम करण्यात येईल, असे त्यांनी सांगितले.

नवनिर्वाचित अध्यक्ष व उपाध्यक्षांचे शिक्षक, पालक आणि ग्रामस्थांनी अभिनंदन केले. त्यांच्या नेतृत्वाखाली शाळेच्या विकासाला अधिक गती मिळेल, असा विश्वास यावेळी उपस्थितांनी व्यक्त केला. यावेळी उपळी गावचे उपसरपंच विनायक शेळके, सामाजिक कार्यकर्ते अयुब शेख (हारून भाई), नवाज शेख, खय्युम शेख, सलीम शेख, फेरोज शेख, दत्ता इचके यांच्यासह पालक, शिक्षकवृंद आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# लोकरे सरांच्या कुंचल्यातून 'बोलक्या' झाल्या परडी माटेगांवच्या शाळेच्या भिंती!

## रंगरंगोटीतून समाजप्रबोधनाचा अभिनव उपक्रम ; व्यसनमुक्ती, बालविवाह प्रतिबंध, पर्यावरण, पाणीबचत अन् शिक्षणाचे संदेश भिंतींवर

वडवणी प्रतिनिधी

शाळेच्या भिंती म्हणजे केवळ चार भिंती नव्हेत, तर त्या विद्यार्थ्यांच्या जडणघडणीचे प्रभावी माध्यम ठरु शकतात, हे वडवणी तालुक्यातील परडी माटेगांव येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेने प्रत्यक्ष कृतीतून दाखवून दिले आहे. शाळेच्या भिंतींवर आकर्षक रंगरंगोटी करतानाच त्यावर विविध सामाजिक व शैक्षणिक संदेशांची बोलकी चित्रे साकारण्यात आली आहेत. या अनोख्या उपक्रमामागे शाळेतील सहशिक्षक व उत्कृष्ट चित्रकार तुकाराम गंगाराम लोकरे सर यांची कल्पकता आणि कलाकौशल्य विशेषत्वाने लक्ष वेधून घेत आहे. लोकरे सरांच्या कुंचल्यातून साकारलेल्या चित्रांमुळे शाळेच्या भिंतींना जणू नवी भाषा मिळाली असून, चित्रांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांपासून ग्रामस्थांपर्यंत समाजप्रबोधनाचा संदेश पोहोचविण्याचा अभिनव प्रयत्न करण्यात आला आहे. त्यामुळे परडी माटेगांवची जिल्हा परिषद शाळा आता खऱ्या अर्थाने कात टाकताना दिसत आहे.

तुकाराम लोकरे सर हे अध्यापनासोबतच चित्रकलेची आवड जोपासणारे शिक्षक आहेत. उत्कृष्ट चित्रकार म्हणून त्यांची स्वतंत्र ओळख असून, आपल्या कलागुणांचा उपयोग त्यांनी केवळ कागदापुरता मर्यादित न ठेवता शाळेच्या विकासासाठी आणि समाजप्रबोधनासाठी केला आहे. शाळेच्या भिंतींवर त्यांनी स्वतःच्या कल्पनेतून साकारलेली विविध चित्रे पाहतांना प्रत्येक चित्रामागे एक सामाजिक संदेश दडलेला दिसतो. रंग, रेषा आणि चित्रांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना जीवनमूल्यांचे शिक्षण देण्याचा हा प्रयत्न विशेष कौतुकास्पद ठरत आहे. व्यसनमुक्तीचा संदेश देतांना कोणतेही व्यसन करु नका, रोगांना आमंत्रण देवू नका आणि नशा करी जीवनाची दशा अशा प्रभावी घोषवाक्यांसह चित्रे साकारण्यात आली आहेत. विद्यार्थ्यांच्या मनावर लहान वयातच व्यसनांचे दुष्परिणाम बिंबविण्याच्या दृष्टीने हा उपक्रम महत्त्वपूर्ण ठरत आहे. बालविवाह प्रतिबंध या विषयावरही लोकरे सरांनी प्रभावी चित्ररचना केली आहे. बालविवाह ही सामाजिक समस्या असून त्याविरोधात समाजाने जागरुक राहण्याची गरज या चित्रांमधून अधोरेखित करण्यात आली आहे. यासोबतच टोल फ्री क्रमांक १०९८ देवून गरज पडल्यास मदत घेण्याचा संदेशही देण्यात आला आहे. पाणी हे जीवनाचे मुलभूत साधन असल्याने जल है तो कल है या संदेशातून पाणी बचतीचे महत्त्व सांगण्यात आले आहे.

त्याचबरोबर वृक्षारोपण, निसर्गसंवर्धन आणि पर्यावरण रक्षणाचे संदेशही चित्रांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचविण्यात आले आहेत. एक कदम स्वच्छता की ओर या




संदेशातून स्वच्छतेचे महत्त्व सांगण्यात आले आहे. कचऱ्याचे योग्य व्यवस्थापन, परिसर स्वच्छ ठेवणे आणि आरोग्याची काळजी घेणे याबाबतही जनजागृती करण्यात आली आहे. दूषित जल को हटाना है, डेंग्यू-मलेरिया से सबको बचाना है या संदेशातून डेंग्यू, मलेरिया यांसारख्या आजारांपासून बचाव करण्यासाठी स्वच्छतेचे महत्त्व अधोरेखित करण्यात आले आहे. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक विकासालाही या उपक्रमात प्राधान्य देण्यात आले आहे. ज्ञान वाढवा, जग बदला या प्रेरणादायी संदेशासह शैक्षणिक चित्रे साकारण्यात आली असून, विद्यार्थ्यांमध्ये शिक्षणाची गोडी निर्माण करण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. या संपूर्ण उपक्रमाला सरपंच माधव शेंडगे यांचे मोलाचे सहकार्य व मार्गदर्शन लाभले आहे. लोकसहभागातून शाळेच्या परिसराचा कायापालट करण्याचे काम सुरु असून ग्रामस्थही शाळेच्या विकासासाठी उत्स्फूर्तपणे सहकार्य करीत आहेत. शाळेची रंगरंगोटी, भिंतींवरील आकर्षक चित्रे आणि त्यातून दिले जाणारे सामाजिक संदेश यामुळे विद्यार्थ्यांना आनंददायी वातावरण मिळत असून, शाळेत येणाऱ्या पालकांचे आणि ग्रामस्थांचेही लक्ष या उपक्रमाकडे वेधले जात आहे. परडी माटेगांवच्या जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील या बोलक्या भिंती सध्या परिसरात चर्चेचा विषय ठरत आहेत. तुकाराम गंगाराम लोकरे सर यांच्या कुंचल्यातून साकारलेली ही चित्रे शाळेचे सौंदर्य वाढविण्याबरोबरच सामाजिक परिवर्तनाचा संदेश देत आहेत. शिक्षक हा केवळ शिकविणारा नसतो, तर तो समाज घडविणारा घटक असतो, याची प्रचिती लोकरे सरांच्या या उपक्रमातून येते. अध्यापनासोबत कलेचा उपयोग समाजप्रबोधनासाठी करणाऱ्या तुकाराम लोकरे सरांच्या कलागुणांचे आणि त्यांच्या या अभिनव उपक्रमाचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे. परडी माटेगांव येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेच्या या उपक्रमामुळे शाळा सुंदर होण्यासोबतच समाज सुंदर करण्याचा संदेशही भिंतींवर उमटला आहे.

### लोकरे सरांचे कलाकौशल्य अनुकरणीय : गटशिक्षणाधिकारी राहुल भट्टी

**परडी माटेगांव येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेने राबविलेला हा उपक्रम अत्यंत कौतुकास्पद आणि अनुकरणीय आहे. शाळेच्या भिंतींचा उपयोग केवळ सुशोभीकरणासाठी न करता, त्यांना शैक्षणिक व समाजप्रबोधनाचे प्रभावी माध्यम बनविण्याची संकल्पना विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी निश्चितच उपयुक्त ठरणार आहे. सहशिक्षक तुकाराम गंगाराम लोकरे सर यांनी आपल्या कलाकौशल्यातून साकारलेली बोलकी चित्रे विद्यार्थ्यांना सहज आणि आनंददायी पध्दतीने विविध विषयांचे ज्ञान देत आहेत. या अशा नाविन्यपूर्ण उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांमध्ये कल्पनाशक्ती, सर्जनशीलता आणि सामाजिक जाणीव निर्माण होण्यास मदत होते. तालुक्यातील इतर शाळांनीही परडी माटेगांव शाळेचा आदर्श घेवून उपलब्ध साधनसामग्रीचा कल्पकतेने वापर करुन शाळांचे वातावरण अधिक आनंददायी, शैक्षणिक आणि प्रेरणादायी करण्यासाठी पुढाकार घ्यावा.a**

दैनिक पत्रक प्रकाशक मालक संपादक श्री. नितीन सोपानराव ढाकणे मुद्रक विठ्ठल त्रिंबक साबळे मातोश्री ऑफसेट प्रिंटर्स, मोंढा, हैद्राबाद बँकेजवळ परळी वैजनाथ, जि. बीड पिन - 431515 येथे छापुन मुख्य कार्यालय दैनिक अतुल्य महाराष्ट्र, जलालपुर रोड परळी वै. ता. परळी वै.जि.बीड (महाराष्ट्र) पिन - 431515 येथे प्रकाशित केले आहे. संपादक नितीन सोपानराव ढाकणे, मो. 8446447777 (वाद : परळी न्यायलय अंतर्गत)

# लोकसेवार्थ : व्यसन मुक्ती केंद्र पुणे

व्यसन ही एक अशी समस्या आहे जी केवळ व्यक्तीलाच नाही तर संपूर्ण कुटुंबाला त्रास देते. दारू, ड्रग्ज किंवा इतर कोणत्याही प्रकारच्या व्यसनाशी झगडणाऱ्या व्यक्तीला आणि त्यांच्या कुटुंबियांना योग्य वेळी योग्य वैद्यकीय मदत मिळणे अत्यंत महत्त्वाचे असते. केअर नेक्स्ट व्यसन मुक्ती केंद्र पुणे येथे रुग्णांना आणि त्यांच्या कुटुंबियांना पूर्णपणे गोपनीय, सुरक्षित आणि सहानुभूतीपूर्ण वातावरणात व्यसनमुक्तीचा मार्ग दाखवला जातो. हे केंद्र अनुभवी डॉक्टर्स, मानसोपचारतज्ज्ञ आणि समुपदेशकांच्या टीमसह पुण्यात कार्यरत आहे. वैद्यकीय देखरेखीखाली डिटॉक्सिफिकेशनपासून ते समुपदेशन आणि कौटुंबिक थेरपीपर्यंत, प्रत्येक टप्प्यावर रुग्णाची काळजी घेतली जाते. व्यसनावर वेळेत उपचार सुरू केल्यास आरोग्य, नातेसंबंध आणि आयुष्याची गुणवत्ता सुधारण्यास मोठी मदत होते. व्यसनमुक्ती केंद्रात दाखल होण्याचा निर्णय घेणे सोपे नसते. त्यामुळे संपूर्ण प्रक्रिया गोपनीय ठेवली जाते आणि रुग्णाच्या प्रतिष्ठेचा पूर्ण आदर राखला जातो.

व्यसनमुक्ती केंद्र म्हणजे असे वैद्यकीय आणि मानसोपचार सुविधा असलेले ठिकाण, जिथे दारू, ड्रग्ज किंवा इतर मादक पदार्थांच्या व्यसनाने त्रस्त असलेल्या व्यक्तींवर शास्त्रोक्त पद्धतीने उपचार केले जातात. अशा केंद्रांमध्ये डॉक्टर, मानसोपचारतज्ज्ञ, क्लिनिकल सायकॉलॉजिस्ट आणि प्रशिक्षित समुपदेशक एकत्रितपणे काम करतात.व्यसन मुक्ती केंद्र पुणे मध्ये दारूचे व्यसन, अंमली पदार्थांचे व्यसन, तंबाखू व निकोटीन व्यसन, झोपेच्या गोळ्या किंवा इतर औषधांचे व्यसन इत्यादी व्यसनांवर उपचार केले जातात:व्यसनमुक्तीच्या प्रक्रियेत वैद्यकीय देखरेख अत्यंत महत्त्वाची असते, कारण अचानक व्यसन सोडल्यास शारीरिक आणि मानसिक त्रास होऊ शकतो. यासाठी अनुभवी डॉक्टरांच्या मार्गदर्शनाखाली सुरक्षित डिटॉक्सिफिकेशन आवश्यक असते.

पुनर्वसनाचा प्रवास हा फक्त शरीरातून व्यसनकारक पदार्थ काढून टाकण्यापुरता मर्यादित नसतो. यामध्ये मानसिक आरोग्य सुधारणे, वर्तनात बदल घडवणे आणि सामाजिक-कौटुंबिक नातेसंबंध पुन्हा प्रस्थापित करणे यांचाही समावेश होतो. व्यावसायिक पुनर्वसनाचे फायदे म्हणजे संरचित उपचार, तज्ज्ञांचे मार्गदर्शन आणि दीर्घकालीन आधार, जे घरगुती किंवा असंघटित प्रयत्नांतून मिळणे कठीण असते.या केंद्रात प्रत्येक रुग्णासाठी वैयक्तिकृत आणि पुराव्यावर आधारित) उपचार पद्धती वापरल्या जातात.

डिटॉक्सिफिकेशन म्हणजे शरीरातून व्यसनकारक पदार्थ सुरक्षितपणे बाहेर काढण्याची प्रक्रिया. ही प्रक्रिया नेहमी डॉक्टरांच्या देखरेखीखाली केली जाते, कारण दारू किंवा ड्रग्ज अचानक सोडल्यास गंभीर शारीरिक लक्षणे दिसू शकतात.केंद्रात डिटॉक्स प्रक्रियेदरम्यान रुग्णाच्या महत्त्वाच्या शारीरिक निर्देशांकांवर सतत लक्ष ठेवले जाते. विथड्रॉवल लक्षणे कमी करण्यासाठी आवश्यकतेनुसार औषधोपचार दिला जातो, जेणेकरून रुग्णाला कमीत कमी त्रास होईल आणि सुरक्षितता राखली जाते समुपदेशन ही व्यसनमुक्तीच्या प्रवासातील महत्त्वाची पायरी आहे. वैयक्तिक समुपदेशनात रुग्णाला त्याच्या व्यसनामागील कारणे, भावनिक अडचणी आणि विचारसरणी समजून घेण्यास मदत केली जाते.काही रुग्णांना डिटॉक्स आणि रिकव्हरी प्रक्रियेदरम्यान औषधांची गरज भासते. अशा वेळी मानसोपचारतज्ज्ञांच्या सल्ल्यानुसार आणि सतत वैद्यकीय निरीक्षणाखाली योग्य औषधे दिली जातात.व्यसनमुक्तीमध्ये कुटुंबाचा सहभाग खूप महत्त्वाचा असतो. कौटुंबिक समुपदेशनाद्वारे कुटुंबियांना व्यसनाचे स्वरूप समजावले जाते आणि रुग्णाला आधार कसा द्यावा याचे मार्गदर्शन केले जाते.




# शून्यातून विश्व : उद्योग विश्वात सांगलीचा ठसा उमटवणाऱ्या पयोदची यशोगाथा



महाराष्ट्रातील सांगली जिल्ह्यातील कवठे-महांकाळ हा तालुका आज जगाच्या नकाशावर उठून दिसत आहे, ते पयोद उद्योगसमूह आणि त्याचे संस्थापक देवानंद लोंढे यांच्यामुळेच. देवानंद यांचा जन्म कवठे-महांकाळ तालुक्यात असलेल्या हिंगणगावातील एका दलित कुटुंबात झाला. घरची आर्थिक परिस्थिती बेताची असूनही देवानंद यांनी अभियांत्रिकीचे शिक्षण पूर्ण केले. त्याकाळी सांगलीतील एका सूतगिरणीत त्यांना सुपरवायजर म्हणून नोकरी करावी लागली, जी खरे पाहता त्यांच्या शिक्षणास अनुकूल अशी नव्हती. अखेरीस १९९२ साली त्यांनी नोकरीच्या शोधार्थ गाव सोडण्याचा निर्णय घेतला. त्यानंतरचा काळदेखील देवानंद यांची परीक्षा पाहणारा होता. मुंबई आणि नाशिक येथे काही काळ त्यांनी नोकरी केली. मात्र त्यांना अपेक्षित असे यश मिळाले नाही. २००१ साली गुजरात येथे झालेल्या भूकंपानंतर देवानंद हे ऑक्सफॅम जीबी या आंतरराष्ट्रीय संस्थेअंतर्गत तेथील लोकांचे पुनर्वसन करण्याचे काम करत होते. तसेच त्यांनी राजस्थानमधील अवकर्षणग्रस्त परिसरात पाणी साठवण्यासाठी उपाययोजनादेखील राबवल्या. त्यानंतर त्यांनी युनिसेफ, ऑक्सफॅम, रिलीफ इंटरनॅशनल अशा मान्यवर संस्थांसाठी सल्लागार म्हणून त्यांनी ८० देशांकरिता काम पाहिले. देवानंद यांनी अफगाणिस्तानमध्येदेखील काही काळ भरपूर पगाराची नोकरी केली. मात्र गावची ओढ त्यांना स्वस्थ बसू देत नव्हती.एकच इच्छा होती की, हिंगणगावात निर्माण केलेल्या उत्पादनाला आंतरराष्ट्रीय बाजरपेठेत स्थान मिळायला हवे. तसेच ते उत्पादन लोकांनी सहानुभूतीपोटी विकत घ्यायला नको, उत्पादनाचा दर्जा पाहूनच त्याची विक्री व्हायला हवी. त्यावेळेस त्यांच्या मनात हातमोजे तयार करण्याचा विचार आला. हॅण्डग्लोव्हजला मुख्य बाजारपेठ ही जपानमध्ये होती. तेथील लोक हे स्वच्छतेच्याबाबतीत खुपच काटेकोर आहेत. तेथील राजकारणीदेखील आपल्या सभांदरम्यान सफेद हातमोज्यांचा वापर करतात. कामगारांचे हात स्वच्छ आहेत, कोणत्याही भ्रष्टाचाराने ते बरबटलेले नाहीत, हे दाखवण्याचा तो प्रतिकात्मक प्रयत्न असतो.' या व्यवसायाच्या पूर्वतयारीसाठी त्यांनी हातमोज्यासाठी प्रसिद्ध असलेले थेट चीन गाठले. तेथे ते अनेक कंपन्या फिरले. तेथे त्यांना बराच चांगला-वाईट अनुभव आला. चीनमध्येच एका कंपनीने त्यांना हातमोजे कसे बनवायचे याचे प्रशिक्षण दिले. त्या ठिकाणहून एक मशीन त्यांनी खरेदी केली आणि पुन्हा हिंगणगाव गाठले. हातमोजे बनवण्याच्या कामासाठी महिला कर्मचाऱ्यांची आवश्यकता होती. अखेरीस त्यांनी या कामाचे प्रशिक्षण घेणाऱ्या महिलांना १०० रुपये विद्यावेतन देण्याचे ठरविले. त्यांची ही युक्ती कामी आली आणि स्थानिक महिलांनी त्यांच्याकडे हातमोजे बनविण्याचे प्रशिक्षण घ्यायला सुरुवात केली. कालांतराने देवानंद यांनी चीनमधुन अजून मशीन्स मागवल्या आणि हातमोजे बनवण्याचे काम सुरू केले. अशा प्रकारे ५ मे २००८ रोजी देवानंद यांनी हातमोजे बनविण्याच्या आपल्या व्यवसायाला खऱ्या अर्थाने सुरुवात केली. देवानंद यांनी आपल्या या व्यवसायाचे 'पयोद उद्योगसमूह' असे नामकरण केले. याबद्दल बोलताना देवानंद सांगतात की, 'पयोद हा एक संस्कृत शब्द असून, त्याचा अर्थ पाण्याने भरलेला काळा ढग. आमचा परिसर अवकर्षणग्रस्त आहे ज्याचा फटका स्थानिकांच्या रोजगाराला बसतो. मात्र पयोद उद्योगसमूहामुळे तेथील स्थानिकांच्या हाताला सदैव काम मिळेल.' पयोद उद्योगसमूहात सध्या ७५० ते ८०० महिला कर्मचारी कार्यरत आहेत. स्थानिक महिलांना घर सांभाळून रोजगार मिळवता यावा, याकरिता देवानंद यांनी त्या महिलांना घरातूनच काम करण्याची संधी दिली आहे. त्यांनी प्रत्येक महिलेला एक मशीन दिले असून, त्यावर ती हातमोजे बनविण्याचे काम करते. पयोद उद्योगसमूहाच्या कारखान्यात प्रत्यक्षपणे सात ते आठ मजूर काम करतात. पयोद उद्योगसमूहाची पहिली ऑर्डर निर्यात करताना त्या कंटेनरची गावात वाजतगाजत मिरवणूक काढण्यात आली होती, अशी आठवण ते सांगतात. सप्ततारांकित, पंचतारांकित हॉटेलमध्ये पयोदचे हातमोजे वापरण्यास सुरुवात करण्यात आले असल्याचे देवानंद सांगतात. पयोद कंपनीची सध्याची उलाढाल आठ कोटींची असून, भविष्यकाळात ती २५ कोटींपर्यंत नेण्याचा देवानंद यांचा मानस आहे. - **संकलन –संयोजन सुबोध रणशेवरे**

## पांडुरंग आठवले



पांडुरंगशास्त्री आठवले (ऑक्टोबर 19, 1920- ऑक्टोबर 25, 2003) हे मराठी तत्त्वज्ञ होते. ते स्वाध्याय परिवाराचे प्रणेते, संस्थापक होते. त्यांना रेमन मॅगसेसे, टेंम्पलटेंट पुरस्कार, महात्मा गांधी पुरस्कार, लोकमान्य टिळक पुरस्कार, पद्मविभूषण, अशा विविध पुरस्काराने गौरवण्यात आले. त्यांचा जन्मदिवस स्वाध्याय परिवार जगभर मनुष्य गौरव दिन म्हणून साजरा करतात.पांडुरंगशास्त्री आठवलेंचा जन्म ऑक्टोबर 19,1920 रोजी रोहे या कोकणातील गावी झाला.

पारंपारिक शिक्षणाबरोबर 'सरस्वती संस्कृत पाठशाळेत' संस्कृत व्याकरणाबरोबर न्याय, वेदांत, साहित्य, त्याचबरोबर इंग्लिश भाषा साहित्याचा अभ्यास पांडूरंगशास्त्री यांनी केला. त्यांना रॉयल ऐशियाटिक सोसायटी मुंबई या संस्थेने सन्माननीय सभासद पद देऊन सन्मानीत केले होते. या ग्रंथालयात त्यांनी कादंबरी विभाग सोडून सर्व मानव्य शाखेतील प्रमुख लेखकांचे, ग्रंथाचे अध्ययन केले. वेद, उपनिषदे, स्मृती, पुराणे यावर चिंतन केले. इ.स. 1992 मधे त्यांना टिळक पुरस्कार मिळाला तो पुरस्कार देतांना तेव्हाचे राज्यपाल चिदंबरम सुब्रमणियम म्हणाले होते ' विद्वत्ता आणि दैवी शक्तीचा संगम झाल्यावरच समाजाचे आणि देशाचे हित सुरक्षीत राहते. पांडुरंग शास्त्री आठवले यांची शिकवण सर्व समाजाने आचरण्यात आणण्याची गरज आहे. पांडुरंगशास्त्री हे आजच्या युगातील दैदीप्यमान आशेचा किरण आहेत.

## कथा
## लबाड मनुष्याची फजिती

एक कोंबडा आणि एक कुत्रा प्रवास करीत होते. ते एके दिवशी रात्री एका वृक्षाजवळ वस्तीस राहिले. कोंबडा झाडावर चढून बसला व कुत्रा बुंध्यापाशी पडून झोपी गेला.

पहाटेस सूर्योदय झाला त्यावेळी कोंबडा मोठयाने आरवला. तो शब्द ऐकून एक कोल्हा त्या ठिकाणी आला. त्याने पाहिले तो कोंबडा उंच झाडावर बसला आहे.

मग त्यास फसवून मारून खावे, या हेतूने कोल्हा म्हणतो, 'अरे, तुझा स्वर किती मधुर आहे ! तुझे गायन ऐकून मी इतका खूष झालो आहे की, तुला एकदा आलिंगन दयावे असे मला वाटते आहे.' ती त्याची लुच्चेगिरी लक्षात आणून कोंबडा उत्तर करतो, 'गडया, झाडाखाली जो पहारेकरी निजला आहे, त्यास जागा करून दरवाजा उघडण्याविषयी विनंति कर, म्हणजे तुझी माझी भेट होईल.' हे बोलणे कोल्हयास खरे वाटून, त्याने कुत्र्यास हाक मारली.

ती ऐकताच कुत्रा जागा झाला व त्याने एका क्षणात कोल्हयास मारून टाकले.

तात्पर्यः- साधारण लोकांकडूनही लबाड मनुष्याची फजिती झाल्याशिवाय राहत नाही.

## कविता
## बिनभितीची शाळा

बिनभितीची शाळा
हिडू ओढे, धुंडू ओहळ
झाडावरचे काढू मोहळ
चिडत्या, डसत्या मधमाशांशी
जरा सामना करू
बघू बंगला या मुंग्यांचा
सूर ऐकूया त्या भुंग्यांचा
फुलाफुलांचे रंग दाखवित
फिरते फुलपाखरू
बिनभितीची उघडी शाळा
लाखो इथले गुरू
झाडे, वेली, पशू, पाखरे
यांशी गोष्ट करू
भल्या सकाळी उन्हात न्हाऊ
ऐन दुपारी पर्ह्यात पोहू
सायंकाळी मोजू चांदण्या
गणती त्यांची करू
कसा जोंधळा रानी रुजतो?
उंदिरमामा कोठे निजतो ?
खबदाडीतील खजिना त्याचा
फस्त खाऊनी करू
सुग्रण बांधी उलटा वाडा
पाण्यावरती चाले घोडा
मासोळीसम बिनपायांचे
बेडकीचे लेकरू
हलवू झाडे चिटबोरांची
पिसे शोधुया वनी मोरांची
माळावरची बिळे चला रे
काठीने पोखरू

## प्राण्यांची ओळख
## घोडा





मानवाने घोडे माणसाळवून त्यांचा वाहन म्हणून प्राचीन काळापासून उपयोग केला आहे. घोड्यांच्या जगभरात अनेक प्रजाती आहेत. मंगोलिया सारखे काही देश तर तिथल्या आजतागायत अस्तित्वात असलेल्या अश्व-संस्कृतीसाठीच प्रसिद्ध आहेत. जगभरात आढळणा-या घोड्यांच्या काही प्रमुख प्रजाती. अरबी घोडा ध्रुवीय घोडा तट्टू स्कॅंडिनेव्हीयन घोडा भारतीय घोडा थरो ब्रेड घोडा इंग्रजी घोडा अमेरिकन घोडा मंगोलियन घोडा ओस्ट्रेलियन घोडा इ.भारतीय घोडा भारतवर्षाला अश्वारोहणाचा प्रदीर्घ इतिहास आहे. भारतीय उपखंडाची व्याप्ती पूर्वी ब-याच दूरवर पसरलेली असल्याने,आज ज्या प्रजाती स्थानिक प्रदेशाच्या नावाने ओळखल्या जातात जसे की सिंधी घोडा, हे आजही मूळ भारतीय अश्व म्हणूनच ओळखले जातात. भारतीय अश्वांच्या काही प्रमुख प्रजाती खालील प्रमाणे १) सिंधी घोडा २) मारवाडी घोडा ३) काठियावाडी\काठेवाडी घोडा ४) पंजाबी घोडा ५) भिमथडी तट्टू ६) पहाडी तट्टू ७) भारतीय सेना प्रजातीचा घोडा (ही इंग्रजांच्या काळापासून वेगळेपण जपलेली अशी एक संमिश्र अश्व प्रजाती असून या जातीचे घोडे, भारतीय सेना वगळता संपूर्ण जगात कोठेही आढळत नाहीत.

## छोट्यांच्या पाककृती

तुम्हाला सारखी भूक लागलेली असते. ती सुध्दा तुमच्या आवडीच्या पदार्थांची. पण पदार्थाची. पण आई मात्र तुमच्या मनासारखे काही करू देत नाही. खरे आहे ना? मग आपण एक गंमत करू या. तुम्हीच स्वयंपाक घरात शिरून फारशी धडपड न करता काही पदार्थ स्वतःचे स्वतः बनवू शकालात तर? काय म्टलात, जमणार नाही? छे छे अगदी सोपे पदार्थ तुम्हाला बनविता येतील त्यासाठी ते कसे बनवायचे याची साधी सोपी रीत पुढे दिलेली आहे.यात एक गोष्ट मात्र लक्षात ठेवायची गॅस, मिक्सर काही वापरायचे नाही. सुरी, हात न कापता वापरता येत असेल तर ती वापरायची. थोडीशी पूर्वतयारी आई, ताई किंवा स्वयंपाकाच्या काकूंकडून करून घ्यायची. आणि बाकीचे आपण आपले करून घ्यायचे. चला मग. आपण स्वयंपाक घराकडे आपला मोर्चा वळवू या काहीतरी नवीन करण्यासाठी - आणि आवडीचे पदार्थ खाण्यासाठी !'



### कच्च्या केळांचा शिरा


### साहित्य

कच्ची केळी - ३ ते ४
साखर - २५० ग्राम
तूप - १ कप
काजू - १/२ कप (बारीक तुकडे केलेले )
दूध - २ कप
वेलची - ३ ते ४ ( कुटून पूड केलेली )

### कृती

कच्च्या केळींना धुऊन प्रेशर कुकरमध्ये एकाद कप पाणी टाकून १० मिनिटे (किंवा एक सिटी होईपर्यंत ) शिजून घ्या . तयार केळींची साल काढून वेगळी करा व एकाद प्याल्याने वा चमच्याने चांगले कुस्करून बाजूला ठेवा. एका पॅन मध्ये तूप टाका तूप गरम झाले कि त्यात कुस्करलेली केळी परतून घ्या. त्यात साखर टाका आणि आणखी थोड्या वेळ परता . आता त्यात दूध व काजू टाका व मधून मधून हलवीत जरा घट्ट हिपर्यंत शिजवा . आता त्यात वेलची पावडर टाकून जरा परता . तुमचा कच्च्या केळांचा शिरा तयार आहे , गरमा गरम सर्व करा .

## दिलेल्या चित्रात रंग भरा





दैनिक
अतुल्य महाराष्ट्र
बीड, गुरुवार, 20 ऑगस्ट 2026
Last page

# राज्यात रेशीम कोष ला सर्वाधिक उच्चांकी भाव प्राप्त

## मानमोडे बंधूचे ऋषिकेश कराड यांच्याकडून अभिनंदन



**लातूर | प्रतिनिधी**

रेशीम कोष उत्पादन या व्यवसायाकडे शेतकऱ्यांचा कल वाढला असून रेशीम कोषा ला प्रतिक्विंटल ८४ हजार रुपयाचा राज्यातील सर्वाधिक उच्चांकी भाव मिळाल्याबद्दल खरोळा येथील रेशीम कोष उत्पादक शेतकरी बालाजी मानमोडे आणि दत्ता मानमोडे यांचा भाजपाचे युवा नेते तथा कौशल्य सिल्कचे प्रकल्प संचालक ऋषिकेशदादा रमेशआप्पा कराड यांनी यथोचित सत्कार करून अभिनंदन केले.

कमी खर्च आणि कमी कालावधी लागणाऱ्या रेशीम कोष उत्पादन व्यवसायाकडे गेल्या काही वर्षापासून शेतकऱ्याचा कल वाढला आहे. रेणापूर तालुक्यातील मौजे खरोळा येथील बालाजी मानमोडे आणि दत्ता मानमोडे हे शेतकरी नियमित रेशीम कोष उत्पादन करतात यांनी तयार केलेल्या रेशीम कोषाला परवा सोलापूरच्या मार्केटमध्ये प्रति क्विंटल तब्बल ८४ हजार रुपयाचा भाव मिळाला आहे. हा भाव राज्यात सर्वाधिक असून एक एकर शेतीतील तुती लागवडीतून २ लाख ४५ हजार रुपयाचे उत्पादन अवघ्या दीड महिन्यात मिळाले आहे. मानमोडे बंधूंचे रेशीम कोष उत्पादन अत्यंत चांगल्या उच्च दर्जाचे असल्याने त्यांना हा भाव मिळाला आहे. मिळालेला भाव हा इतरांना प्रेरणादायी असल्याचे यावेळी युवा नेते ऋषिकेशदादा कराड यांनी बोलून दाखविले.

यावेळी भाजपाचे महेंद्र गोडभरले, अमर चव्हाण, रमाकांत फुलारी, चंद्रकांत कातळे, हनुमंत राऊतराव, प्रताप राऊतराव, पुंडलिक अदुडे, बाळू गौंड, मुस्तफा तशेवाले, धर्मराज मानमोडे, राजू कांबळे यांच्यासह अनेक जण होते.



### छायाचित्रकार संघटना परळीच्या वतीने

# जागतिक छायाचित्र दिन उत्साहात साजरा

परळी | प्रतिनिधी

परळीतील छायाचित्रकार संघटनेच्यावतीने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यात सकाळी9वा. सर्व छायाचित्रकार यांनी जिजामाता उद्यानात एकत्र येऊन महाराष्ट्राचा मानाचा भगवा फेटा बांधून घेतला व सर्वांनी माता जिजाऊ

यांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. जयघोष केला उद्यानातील शंकर भगवान मूर्ती जवळ फोटोसेशन करून मोटार सायकल रॅलीने छ. शिवाजी महाराज आण्णाभाऊ साठे, डॉ .बाबासाहेब आंबेडकर, छत्रपती संभाजी महाराज ,या महामानवांना पुष्पहार अर्पण करून रॅलीने सुयोग फोटो वर्ल्ड येथे कार्यक्रम स्थळी एकत्र आले.

या ठिकाणी मुख्य कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते रवी वळसे यांच्या अध्यक्षतेत गटनेते न.प. वैजनाथराव सोळुंके शिक्षण सभापती योगेश जी मेनकुदळे, ह .भ .प. कोकाटे महाराज या प्रमुख पाहुण्यांच्या उपस्थितीत कार्यक्रम पार पडला या तीनही पाहुण्यांनी सर्वांना या दिनाच्या शुभेच्छा दिल्या तसेच आमच्या माध्यमातून परळीतील छायाचित्रकारांसाठी छायाचित्रकार भवन आर्ट गॅलरी साठी विशेष प्रयत्न करून एक वर्षाच्या आत ही जागा उपलब्ध होईल पुढील वर्षीचा कार्यक्रम त्याच ठिकाणी होईल असे आश्वासन दिले. पाहुण्यांच्या या प्रतिसादाने छायाचित्रकारांनी टाळ्यांचा कडकडाट करून स्वागत केले, उत्साहात आले आणि भारावले.

ह .भ .प .कोकाटे महाराज मनोगतात आषाढी एकादशीसाठी परळीत होणाऱ्या संत नामदेव महाराज पालखीचे रिंगण सोहळ्यासाठी छायाचित्रकारांनी उपस्थिती देऊन फोटो काढून द्यावेत यात स्पर्धा होऊन उत्कृष्ट छायाचित्राला प्रथम 5000 द्वितीय 3000 तृतीय 1500 देण्याची घोषित केले याचेही स्वागत जोरदार टाळ्यांनी छायाचित्रकारांनी केले.

तत्पूर्वी कार्यक्रमाची सुरुवात द्वादशपंचम ज्योतिर्लिंग श्री वैद्यनाथ भगवान यांच्या प्रतिमेचे पूजन दीप प्रज्वलन व छायाचित्रकारांचे उपजीविका साधन यंत्र कॅमेरा याचे पूजन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. व पाहुण्यांचे स्वागत शाल ,पुष्पहार व "भारता प्राण तळमळला "या पुस्तकांनी करण्यात आले.

याच कार्यक्रमात सोलापुर येथील विशाल सर यांनी छायाचित्रकारांसाठी कॅमेरा सर्विसिंगचा मोफत कॅम्प ठेवला होता. यासाठी श्रीराम भाले यांनी सहकार्य केले. आणि बहुसंख्य छायाचित्रकारांचा फायदा झाला. हैदराबाद पुणे मुंबईला होणारे काम इथेच करण्यात आर्थिक बचत झाली असा अभिप्राय चित्रकारांनी दिला .

हा कार्यक्रम सुयोग फोटो वर्ल्ड यांच्या हॉलमध्ये संपन्न झाला संचालक रवी वळसे यांनी सर्वांसाठी अल्पोपहार आयोजन केले होते पदाधिकारी अध्यक्ष ,उपाध्यक्ष, सचिव यांच्या एकसूत्री नियोजनांनी कार्यक्रम खूप छान झाला अशा प्रतिक्रिया पाहुण्यांनी व सर्व छायाचित्रकारांनी व्यक्त केल्या या संपूर्ण कार्यक्रमाचे छायाचित्रण व फोटो रील्सचे काम आकाश गित्ते व गणेश वळसे यांनी केले संघटनेच्या वतीने त्यांचेही स्वागत करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचलन छायाचित्र संघटना अध्यक्ष सुनील फुलारी यांनी केले आभार प्रदर्शन सचिव सोमनाथ वळसे यांनी केले सर्वांच्या सहकार्यासाठी उपाध्यक्ष गोविंद विजापुरे यांनी मनोगत व्यक्त करून आभार मानले अल्पोपहार व चहापानानंतर कार्यक्रम समाप्त झाला.

# पुंडी येथे गुणवंत विद्यार्थी, भजनी मंडळ व शाळा व्यवस्थापन समितीचा भव्य सन्मान

**प्रतिनिधी – सोपान पगारे**

आष्टी तालुक्यातील पुंडी येथे स्व. राजाराम दादा प्रतिष्ठानचे अध्यक्ष श्री. भीमराव थोरवे यांच्या वतीने गावातील गुणवंत विद्यार्थी, श्री हनुमान भजनी मंडळ तसेच शाळा व्यवस्थापन समिती, पुंडी यांचा त्यांच्या उल्लेखनीय कार्याबद्दल ट्रॉफी देऊन गौरव करण्यात आला.

गावातील गुणवंत विद्यार्थ्यांनी शैक्षणिक क्षेत्रात मिळविलेल्या यशाबद्दल त्यांचा सन्मान करण्यात आला. तसेच श्री हनुमान भजनी मंडळाने सलग १५ वर्षे आध्यात्मिक व सामाजिक सेवा बजावत गावामध्ये सलोखा, एकोपा आणि भक्तीची परंपरा जोपासल्याबद्दल त्यांचा विशेष गौरव करण्यात आला.



याचबरोबर शाळा व्यवस्थापन समिती, पुंडी यांनी गावातील शाळेचा कायापालट घडवून आणण्यासाठी केलेल्या उल्लेखनीय कार्याची दखल घेत समितीच्या सर्व सदस्यांचा ट्रॉफी देऊन सन्मान करण्यात आला.

यावेळी प्रतिष्ठानचे अध्यक्ष श्री. भीमराव थोरवे यांनी, "गावाच्या विकासासाठी, सामाजिक सलोख्यासाठी, शैक्षणिक प्रगतीसाठी आणि समाजहितासाठी उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्ती व संस्थांचा यापुढेही स्व. राजाराम दादा प्रतिष्ठानच्या वतीने सन्मान केला जाईल," असे सांगितले. या सन्मान सोहळ्यास सरपंच श्री. बाळासाहेब थोरवे, श्री. शिवाजी वाडेकर सर, श्री. उपसरपंच अनिल गलांडे, श्री. अर्जुन काकडे, श्री. उत्तम सुरवसे(अध्यक्ष), श्री. वैभव खांदवे, श्री. बळीराम वाडेकर, श्री. वसंत भागवत, सर्व भजनी मंडळी, शाळा व्यवस्थापन समितीचे सर्व सदस्य, महिला, गावकरी व वारकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या उपक्रमातून गावासाठी योगदान देणाऱ्यांचा सन्मान आणि त्यांच्या कार्याला प्रोत्साहन देण्याची प्रेरणादायी परंपरा पुंडी गावात सुरू झाली आहे.

# दै. 'मराठवाडा साथी' कार्यालयात स्व. मोहनलालजी बियाणी यांची जयंती उत्साहात साजरी

## स्मृतीशेष काकाजींची पत्रकारिता म्हणजे समाजसेवेचे प्रभावी माध्यम- भगवान साकसमुद्रे

**परळी / प्रतिनिधी :**

दै. 'मराठवाडा साथी'चे संस्थापक संपादक, ज्येष्ठ पत्रकार स्व. मोहनलालजी बियाणी यांची जयंती दै. 'मराठवाडा साथी'च्या कार्यालयात भावपूर्ण वातावरणात साजरी करण्यात आली. यावेळी उपस्थितांनी स्मृतीशेष बियाणी यांच्या प्रतिमेस अभिवादन करून त्यांच्या स्मृतींना उजाळा दिला. पत्रकारिता क्षेत्रात त्यांनी दिलेले योगदान, निर्माण केलेली पत्रकारितेची परंपरा आणि अनेक पत्रकारांना दिलेले मार्गदर्शन याबद्दल उपस्थितांनी कृतज्ञता व्यक्त केली. या कार्यक्रमास जयप्रकाश बियाणी, दै. 'पुण्यभूमी'चे उपसंपादक भगवान साकसमुद्रे, सम्राट गित्ते, सुरेश रायभोळे, नागेश व्हावळे, रवि पतंगे, सिद्धू मुंडे, अनिल गायकवाड यांच्यासह पत्रकारिता व सामाजिक क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.

यावेळी मनोगत व्यक्त करताना दै. 'पुण्यभूमी'चे उपसंपादक भगवान साकसमुद्रे यांनी स्व. मोहनलालजी बियाणी यांच्या जीवनकार्याच्या अनेक आठवणींना उजाळा दिला. यावेळी ते बोलतांना म्हणाले की, स्व. बियाणी हे केवळ वृत्तपत्राचे संस्थापक-संपादक नव्हते, तर पत्रकार घडविणारे मार्गदर्शक होते. पत्रकारितेत नव्याने येणाऱ्या तरुणांना ते आपुलकीने मार्गदर्शन करीत. लेखन कसे असावे, बातमी कशी मांडावी, कोणत्या विषयाला प्राधान्य द्यावे आणि पत्रकाराचे समाजाप्रती नेमके काय कर्तव्य असले पाहिजे, याबाबत ते सातत्याने मार्गदर्शन करत असत.



पत्रकारितेचा केंद्रबिंदू हा समाजहित असला पाहिजे, सत्य आणि वस्तुनिष्ठता यांना प्राधान्य दिले पाहिजे, तसेच सामान्य माणसाच्या प्रश्नांना वाचा फोडण्याचे काम पत्रकाराने केले पाहिजे, अशी त्यांची भूमिका होती. निर्भीडपणे सत्य मांडण्याबरोबरच लेखणीची ताकद समाजाच्या हितासाठी वापरण्याचा संदेश त्यांनी आपल्या कार्यातून दिला.

स्मृतीशेष मोहनलालजी बियाणी यांच्या मार्गदर्शनाखाली अनेक पत्रकारांनी आपल्या पत्रकारितेची सुरुवात केली. बातमी लेखनापासून ते वृत्तपत्राच्या कामकाजापर्यंत प्रत्येक बाबतीत ते बारकाईने मार्गदर्शन करीत. एखाद्या बातमीतील त्रुटी दाखवून देताना तिची योग्य मांडणी कशी करावी, याचेही ते प्रत्यक्ष उदाहरण देत असत.

"काकाजींनी पत्रकारिता केवळ व्यवसाय म्हणून केली नाही, तर ती समाजसेवेचे प्रभावी माध्यम म्हणून जगली. त्यांनी अनेकांना हाताला धरून पत्रकारितेच्या क्षेत्रात उभे केले. त्यांचे मार्गदर्शन आणि संस्कार आजही अनेक पत्रकारांच्या लेखणीतून दिसून येतात," असे साकसमुद्रे यांनी सांगितले. स्व. मोहनलालजी बियाणी यांनी पत्रकारितेच्या माध्यमातून समाजातील विविध प्रश्नांना वाचा फोडली. त्यांच्या विचारांचा आणि कार्याचा वारसा पुढे नेणे, हीच त्यांना खरी आदरांजली ठरेल, अशी भावना उपस्थितांनी व्यक्त केली.